चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
१५ फेब्रुवारी, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# खोटे नांव धारण करुन फरार असलेल्या खुनाच्या गुन्हयातील आरोपीस २२ वर्षानंतर पोलीसांनी केले जेरबंद

पोलीस स्टेशन शेगांव अतंर्गत मौजा चारगांव(खुर्द) शिवारात २२ वर्षापुर्वी दिनांक ०२/०७/१९९६ रोजी नाना चिंधू पोईनकर वय ६० वर्ष रा. अर्जुनी हे मौजा चारगांव(खुर्द) येथील बैल बाजारातुन सांयकाळी ७ वाजता दरम्यान त्यांचे गांव अर्जुनीकडे परत जाताना त्यांना रस्त्यामध्ये आरोपी नामे संभा विठू बावणे वय २६ वर्ष रा. अर्जुनी हा भेटला. आरोपी संभा व नाना पोईनकर यांचा मुलगा या दोघांमध्ये काही दिवसापुर्वी किरकोळ भांडण झाले होते. संभा याने त्याकारणावरुन नाना पोईनकर यांना 'तुझा मुलगा कोठे आहे' असे विचारुन भांडणास सुरवात केली. भांडण अगदी विकोपास गेले, आरोपी संभा हा लाकुड तोडण्याचे काम करीत असल्याने त्याचेजवळ असणारे कुऱ्हाडीने त्याने नाना पोईनकर यांचे डोक्यावर मारुन त्यांना ठार मारले. या घटनेबाबत मारोती केशव जुंबाडे रा. अर्जुनी यांचे तक्रारीवरुन आरोपी संभा विठू बावणे रा. अर्जुनी याचेविरुध्द पोस्टे शेगांव येथे अपराध क्रं. ५३/१९९६ कलम ३०२ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. परंतू यातील आरोपी संभा बावणे हा तेव्हांपासुन फरार होता व पोलीसांचा शोध सुरुच होता. पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी जिल्हयाचा प्रभार घेतला तेव्हापासुन फरार व पाहीजे असलेले आरोपींचा शोध घेवुन त्यांना अटक करण्यासाठी प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी सुचना व मार्गदर्शन करण्यास सुरवात केली होती.

पाहीजे असलेला आरोपी संभा याचा शोध चालुच ठेवत तब्बल २२ वर्षानंतर शिताफीने माहीती हस्तगत करीत शेगांव पोलीसांनी आरोपी संभा विठ्ठल बावणे वय ४९ वर्ष यास मौजा रुई खैरी,ता.जि.नागपुर येथुन जेरबंद केले आहे. आरोपीच्या शोध दरम्यान व त्यास अटक केल्यानंतर माहीती समोर आली की, खुनासारखा गंभीर गुन्हा केल्यानंतर आरोपी संभा हा फरार झाल्यांनतर तो पुन्हा अर्जुनी गांवात राहण्याकरीता आलाच नाही. तब्बल २० वर्षे तो पुण्यामध्ये राहीला. या दरम्यान त्याने त्याचे स्वत:चे नांव बंडू विठ्ठल बावणे असे धारण करीत कागदपत्रे सुध्दा याच नांवाने तयार करुन घेतले. पुणे येथे राहतांना आरोपी संभा याने दुसरा विवाह केला. परंतू दुसरी पत्नी मरण पावल्यानंतर तो अंदाजे ३ वर्षापासुन मौजा रुई खैरी,ता.जि.नागपुर येथे येवुन त्याची पहीली पत्नी सौ. कल्पना हीचेसोबत राहू लागला. परंतू, गुन्हा केल्यांनतर कायदयाचे कचाटयातुन कुणीच मुक्त होवू शकत नाही. याप्रमाणेच शेगांव पोलीस आरोपी संभा याचेपर्यंत २२ वर्षानंतरही पोहचले आणि त्यास अटक केली. सदरची महत्वाची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि श्री. तिवारी, ठाणेदार पोस्टे शेगांव, पोहवा. आमने, पोलीस शिपाई बंडू चौधरी, संतोष जाधव, निकीता रासावार पोस्टे शेगांव यांनी मोलाची कामगीरी बजावली आहे. आरोपी सध्या पोलीस कस्टडीमध्ये असुन पुढील तपास शेगांव पोलीस करीत आहे. शेगांव पोलीसांच्या या शोध मोहीमेचे पोलीस अधीक्षक यांनी कौतुक केले आहे.

---